# बीकेसी-धारावी ८९% भुयारीकरण पूर्ण

**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**

कुलाबा-वांद्रे-सीप्झ मेट्रो-३ या भूमिगत प्रकल्पाने एक महत्त्वाचा टप्पा पार केला असून या संपूर्ण मार्गाचे जवळपास ८० टक्के भुयारीकरण पूर्ण झाले असून मिठी नदीखालील बीकेसी स्थानकाचे ८९ टक्के काम पूर्ण झाले असल्याचे मुंबई-मेट्रो रेल कॉर्पोरेशनकडून सांगण्यात आले. विशेष म्हणजे ३० महिन्यांत एकही अपघात न होता मेट्रो-३ ने हा टप्पा गाठला आहे.

मेट्रो-३ या मार्गासाठी एकूण ५६ किलोमीटर (अप आणि डाऊन) लांबीचे भुयारीकरण करायचे आहे. मेट्रो-३ हा मुंबईचाच नव्हे तर भारतातील सर्वात जास्त लांबीचा भुयारी मेट्रोमार्ग आहे. नयानगर येथे लॉन्चिंग शाफ्टमध्ये कृष्णा-१ हे टीबीएम उतरल्यानंतर ६ नोव्हेंबर २०१७ पासून प्रत्यक्षात भुयारीकरणाला सुरुवात झाली.



- वांद्रे- कुर्ला संकुल (बीकेसी) ते धारावीदरम्यान ९० टक्के, तर संपूर्ण मेट्रो- ३ मार्गिकेमध्ये ८० टक्के भुयारीकरणाचे काम पूर्ण झाले आहे.
- बीकेसी स्थानक १८ मीटर खोल असून त्याची लांबी ४७४ मीटर आहे.
- मीठी नदीखालून तीन बोगदे बांधण्याचे काम प्रगतिपथावर आहे. त्यापैकी दोन टीबीएमद्वारे, तर एक १५३ मीटर लांबीचा बोगदा एनएटीएमद्वारे बांधण्यात येत आहे.

मेट्रो-३ मार्गिकेतील सर्वात महत्त्वाचे आणि आव्हानात्मक असलेले मिठी नदीच्या खालून करण्यात येत असलेले भुयारीकरणाचे काम मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनतर्फे सुरू असून एप्रिल महिना अखेरीस पूर्णत्वास नेण्याचा विश्वास एमएमआरसीएलने व्यक्त केला आहे.

सद्यस्थितीत १.५ किमी भुयारीकरणापैकी ९०० मीटरचे भुयारीकरण पूर्ण करण्यात एमएमआरसीएलचा यश आले आहे.